EST2 10.5.2002

**गोपनीय अहवालात "अत्युत्कृष्ट" दर्जाचे शेरे नोंदविण्यासंबंधी.**

---

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक.सीएफआर-१२०१/प्र.क्र.७४/२००१/१३,
मंत्रालय,मुंबई ४०००३२
दिनांक २७ मार्च,२००२

संदर्भ:- शासन निर्णय.सामान्य प्रशासन विभाग क्रमांक.सीएफआर-१२९५/प्र.क्र.३४/९५/१३. दिनांक १ फेब्रुवारी,१९९६.

**प रि प त्र क**

संदर्भाधीन दिनांक १ फेब्रुवारी,१९९६ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये शासकीय अधिकारी/कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यासंबंधीच्या विविध टप्प्यावरील सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. यातील सूचना क्रमांक १० मध्ये **"गोपनीय अहवालामध्ये प्रतिवेदन कालावधीमधील कर्मचा-यांच्या / अधिका-यांच्या कार्यालयीन कामातून दिसून आलेल्या कार्यक्षमतेचे व चारित्र्याचे खरेखुरे व वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले असले पाहिजे. कर्मचारी/अधिकारी यांच्या कामाचा सर्वसाधारण आढावा घेणे शक्य व्हावे म्हणून प्रतिवेदन अधिका-यांनी त्यांनी ज्यांचा गोपनीय अहवाल लिहावयाचा आहे,अशा प्रत्येक कर्मचारी /अधिका-यांच्या संदर्भात कच्चे टिपण (Ephemeral Roll ) ठेवावे. हे टिपण परिशिष्ट क मध्ये विहित केलेल्या तक्त्यात ठेवण्यात यावे. या टिपणात कर्मचारी/अधिकारी यांच्याबद्दल वेळोवेळी आढळून आलेल्या उल्लेखनिय गोष्टी किंवा प्रतिकूल गोष्टी यांची संदर्भासहित नोंद घ्यावी. गोपनीय अहवाल लिहितांना या टिप्पणीतील नोंदीच्या आधारे त्यामध्ये शेरे लिहिण्यात यावेत"**.अशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.तसेच सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "क" मध्ये गोपनीय अहवाल लिहिण्याकरिता ठेवावयाच्या कच्च्या टिपणाचे( Ephemeral Roll ) प्रपत्र देखील विहित केलेले आहे.

२. वरील सूचना स्पष्ट असून देखील गोपनीय अहवाल लिहितांना कच्चे टिपण ठेवले जात नाही. गोपनीय अहवालातील शेरे अहवाल काळातील कर्मचा-यांच्या कामकाजाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करुन दिले जात नाहीत असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. "अत्युत्कृष्ट" असे उच्च दर्जाचे शेरे गोपनीय अहवालात समाविष्ट केल्याने अधिकारी/कर्मचा-यास त्यायोगे निवडसूचीतील वरचढपणा किंवा आगाऊ वेतनवाढ अशा सारखे लाभ अनुज्ञेय ठरतात. त्यामुळे "अत्युत्कृष्ट" शेरे नोंदवितांना प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिका-याने गोपनीय अहवाल काळातील कर्मचा-यांच्या कामकाजाच्या मूल्यांकनासाठी ठेवलेल्या कच्च्या टिपणावरुन ( Ephemeral Roll ) अत्युत्कृष्ट शे-याच्या पृष्ठयर्थ वस्तुस्थितीदर्शक समर्थन गोपनीय अहवालात देणे आवश्यक आहे.

३. सर्व विभागांनी/नियुक्ती अधिका-यांनी या सूचना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधित प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिका-यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. "अत्युत्कृष्ट" शेरे नोंदविलेल्या गोपनीय अहवालातील त्या शे-यांच्या बाबत कच्च्या टिपणा (Ephemeral Roll ) वरुन समर्थन गोपनीय अहवालात नमूद करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.

४. हया सूचना सन २००१-२००२ च्या गोपनीय अहवालापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(प्रकाश लोखंडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

2939
जिल्हाधिकारी ... रत्नागिरी.
10 JUN 2002
EST-IV 14/6